**Review Of Research**
**Volume-2, Issue- 6 , March -2013**
**ISSN : 2249-894X**
Available online at www. lbp.world

# उत्तर पेशवाईतील वस्तूंचे बाजारभाव व भाव — नियंत्रण

**प्रा.डॉ. विश्वनाथ पवार**
**छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.**

**प्रास्ताविक:**

गतकाळाच्या स्मृती, राष्ट्रप्रेम आणि पुढील पिढीला बोध हे इतिहास अभ्यासाचे मुख्य हेतू होत. इतिहास हा समाज व राष्ट्राचा मार्गदर्शक आहे. राज्यकर्त्यांना लष्करी व मुलकी प्रशासनाबरोबरच कला, स्थापत्य, व्यापार इत्यादीबाबत दक्षता घ्यावी लागते. 'उत्तर पेशवाईतील वस्तूंचे बाजारभाव व भावनियंत्रण' हा शोधनिबंधाचा विषय आहे. बाजारभाव योग्य राहण्यासाठी निसर्गाचा समतोल व शांतता कालखंड अपेक्षीत असतो.

**उत्तर पेशवाई:**

उत्तर पेशवाईत सततची धामधुम सुरु होती १४ जानेवारी १७६१ ला मराठे व अब्दाली यांच्यात पानिपतचा रणसंग्राम घडून आला. मराठयांच्या दारुण पराभावने त्यांच्या शत्रूंनी उचल खाल्ली त्यात निजाम हा प्रमुख होय.

'पालखेड, भोपाळ, भालकी, सिंदखेड, उद्‌गीर, भुलेश्वर व राक्षसभुवन असे पुष्कळ विजय पेशव्यांनी निजामावर मिळविले याचा युद्धकाळ १७२७ पासून १७६३ पर्यंतचा आहे.'[१]

'९ फेब्रुवारी १७६३ ते १० ऑगस्ट १७६३ या काळात निजाम व मराठे यांच्यात प्रचंड धुमश्चक्री झाली. निजामाने विनायकदास, जानोजी भोसले, गमाजी व विठ्ठल सुंदर यांच्या माध्यमातून आपल्या सैन्याच्या तीन तुकडया केल्या. एकीने नाशिक, त्र्यंबक, जुन्नर लुटले. दुसरीने चिंचवड, लोहगड, विसापूर घेत पुण्यावर धाड टाकली. . . शत्रू सेनासमुद्राने एक महिना पावतो लूट जाळ केली. . . विठ्ठल सुंदरने तोफखाना घेऊन सासवडच्या रोखे राहून सर्व जाळले. पुरंदर पासून शिरवळपर्यंत गमाजींनी लुट केली . . . नीरथडी—भीमथडी मोगलांचे भक्ष्यस्थानी पडली.'[२]

शत्रूकडून पुणे व आसपासचा प्रदेश लुटला गेल्यामुळे, प्रचंड जीवित व वित्त हानी झाल्याने, पिकांची प्रचंड नासाडी झाल्यामुळे बाजारभाव विस्कळीत होणे, वाढणे स्वाभाविक आहे. अशा अस्थिर परिस्थितीत पहिल्या माधवरावाने बाजारभाव व भावनियंत्रण याबाबत अत्यंत दक्षता घेतल्याचे त्यांच्या रोजनिशीवरुन पहावयास मिळते? हे बाजारभाव व्यापारी व ग्राहक यांच्यासाठी बंधनकारक होते. व्यापार सुरळीत चालण्यासाठी पेशवा माधवरावानी साहुकार तथा व्यापाऱ्यांचा आदर केला. त्यामुळे व्यापाऱ्यांनी व्यापारावर आपले लक्ष केंद्रीत केले. '१८ व्या शतकातील महाराष्ट्रातील साहुकार प्रामुख्याने पैशाच्या

व्यवहारात म्हणजे देणे व घेणे यांच्याशी संबंधीत होते, परंतू पतनिर्मीतीमध्ये अशा साहुकारांचा सहभाग नसे.’[३]

**मराठाकालीन व्यापारविषयक वस्तू :**

**अन्नधान्य:** गहू, ज्वारी, तांदूळ, तीळ, मका, नाचणी, डाळीमध्ये मूग, मसूर, हरभरा, उडीद इ.

**मसाल्याचे पदार्थ:** लवंग, कांदा, लसून, मोहरी, केशर, वेलदोडे, चिंच, गूळ, खडीसाखर, सुंठ, हळद, अफू, खोबरे, तूप, मध इ.

**कापड:** सूत, ताग, मलमल, ताफ्ता, शेला, महाबन, मुंगीपारण, मुसदर, पाटव, महामुदी, कद, घाटी, लुगडी, धोतरे, कांबळी, गोधडी, पासोडी, चिटाचे कापड, शाली, किनखाप, खंबायत, पितांबर, खारा, सखलद इ.

**फळे:** कलिंगड, फणस, ऊस, लिंबे, केळी, आंबे, अननस, काजू, सुपारी इत्यादी.

**इतर:** दुध, तुप, लोणी, मांस, तसेच तांबे, कथील, जस्त इत्यादी धातू व प्राणी इत्यादी घटकांचा व्यापार चालत असे.[४]

**वस्तूंचे बाजारभाव व भाव—नियंत्रण**

**पहिले माधवरावांची रोजनिशी**[५]

| **एका रुपयास** | **वस्तू** | **शेर (मापी)** |
|---|---|---|
| ——’’—— | गहू | १६ |
| ——’’—— | ज्वारी | १६ |
| ——’’—— | हरभरा डाळ | ८ |
| ——’’—— | मूग | १२ |
| ——’’—— | तांदूळ | १२ |
| ——’’—— | तीळ | ३ |
| **एका रुपयास** | **वस्तू** | **शेर (वजनी)** |
| ——’’—— | गूळ | ५ |
| ——’’—— | सैंधव | २ |
| ——’’—— | साबन | १। |
| ——’’—— | सुंठ | २ |
| ——’’—— | खोबरे | २ |
| ——’’—— | जिरे | २ |
| **एका रुपयास** | **वस्तू** | **शेर (मापी)** |
| ——’’—— | कणिक | १२ |
| ——’’—— | कापूस | ४ |
| ——’’—— | तूप | १।।। |
| ——’’—— | दूध | ११ |
| ——’’—— | शेंगा मुगाच्या | ८ |
| ——’’—— | ऊद | अदपाव |
| ——’’—— | खडीसाखर | १ |
| **——’’——** | बदाम | १ |

| | | |
|---|---|---|
| ——''—— | सुपारी | ३ |
| **एक वजनी शेरास** | **वस्तू** | **रुपये** |
| ——''—— | कथील | १ ।। |
| ——''—— | द्राक्षे | १ ।।। |
| ——''—— | मिरी | १ । |
| ——''—— | नवसागर | २ |
| ——''—— | तांबे | २ |
| ——''—— | हिंग | ५ |
| लाकडे एका खंडीस | | ७ |

कोणता जिन्नस कोणी विकावा यासंबंधी पूर्वी जसे नियम असत तसेच तो त्यांनी कोणत्या भावाने विकावा यासंबंधीचेही नियम असत. नियम मोडणाऱ्यांना शासन केले जाई.

**सारांश :**

शत्रू प्रदेश उध्वस्त झाला असताना, राज्याला प्रचंड जीवित व वित्त हानीचा सामना करावा लागला असतानाच्या कालखंडात पेशवे थोरले माधवराव यांनी आपल्या रोजनिशीमध्ये भाग २ पृ.३१४ वर (इ.स.१७६४ मध्ये) अन्नधान्य, फळे, धातू व मसाल्याचे पदार्थ इत्यादींचे व खरेदीदार यांच्यावर बंधनकारक असे. यात दोषी आढळणाऱ्यांना शासन केले जाई. या धोरणामुळे भाव नियंत्रित राखले जावून समाज हीत जोपासले गेल्याचे दिसते.

**संदर्भ :**

१) शेजवलकर त्र्यं.शं., पेशवे निजाम संबंध (१८ वे शतक) पुणे विद्यापीठ, पुणे, पुनर्मुद्रन डिसेंबर १९६३
२) सरदेसाई गो.स., मराठी रियासत, निग्राहक माधवराव, केशन भिकाजी ढवळे, चिराबाजार, मुंबई २, पृ. आवृत्ती १९५४
३) कुलकर्णी जी.टी., बॅकिंग इन दि एटिंथ सेंचुरी : ए केस स्टडी ऑफ द पुना बॅकर (अर्थविज्ञान) पृ. १८०.
४) सरदेसाई बी.एन., मराठयांचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास (१६०० ते १८१८) फडके प्रकाशन, कोल्हापूर पृ.१७१.
५) वाड व पारसनीस (संपा.), पेशवे माधवरावाची रोजनिशी, भाग २, पृ.३१४.